# ईयोब, गीतरत्न उपदेशक स्तोत्र व नीतिसूत्रे

मुलांना शिकविणाऱ्यांनी P4b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, हिब्रू भाषिक इस्राएल लोकांना तू अनेक शतकांपूर्वी सुंदर कविता लिहिण्यास प्रेरणा दिलीस. ह्या सुंदर कवितांचा उपयोग आम्ही मार्गदर्शन आग्रहाचा उपदेश करणे आणि तुझी स्तुती करण्यासाठी करावी याकरिता आमचे साहाय्य कर.''

लोकांच्या गरजांनुसार कार्यक्रमांची निवड करा.

1. **काव्यमय पुस्तकातून शिकविण्यासाठी प्रार्थनापूर्वक देवाच्या वचनातून तयारी करा. प्राचीन हिब्रू काव्याचे अनन्य सौंदर्य व सामर्थ्य उलगडून सांगा.**

- अनेक संस्कृतींमधील काव्य यमकबद्ध आहे, त्यातील शेवटच्या शब्दांचे उच्चार एकसारखे असतात त्यामध्ये वृत्तही असते, कवितेच्या ओळींमध्ये गण आणि मात्रा असतात त्याचा साचा ठरलेला असतो. अशा काव्याचा अनुवाद करणे अवघड असते. देवाचा लोकांसाठीचा मानस होता की त्याचे वचन सर्व भाषांमध्ये वाचले जावे आणि म्हणूनच काव्याची अन्य पद्धत वापरली.
- प्राचीन इस्राएल मधील कवींनी सर्व भाषा व संस्कृतींना अनुरूप ठरेल. अशीच सौंदर्य रचना व ताळमेळ काव्यात वापरला. केवळ शब्दांची रचना आणि जोर देऊन उच्चारायचे शब्द यामध्ये मिलाफ साधण्याऐवजी देवाने कवींना त्यांच्या विचारांच्या अर्थाचा ताळमेळ साधण्याची प्रेरणा दिली. त्यांनी आपल्या काव्यपंक्तीमध्ये विचार दोन वा अधिक प्रकारे व्यक्त करून योग्य तोल साधलेला आहे.
- नीति 16:11 मध्ये समांतर शब्दांनी तोल साधलेला आहे.
- नीति 13:1 मध्ये विरोधी तुलना करून समतोल साधला आहे.



अरे आळशा मुंगीकडे जा, तिचे वर्तन पाहून शहाणा हो (नीति 6:6)

### नाट्यमय पुस्तके: ईयोब व गीतरत्न

ईयोबच्या पुस्तकात देव आणि त्याचा न्यायनिवाडा याबाबतीत टोकाची मते असलेल्या दोन माणसांमधील आवेशपूर्ण, परिणामकारक संवाद नमूद केलेला आहे. ईयोब अध्याय 11 मध्ये सोफर, हा ईयोबचा मित्र, नेहमीचीच सर्व साधारण चूक करतो. ती अशी की लोकांना त्यांच्या पापामुळेच दु:ख सोसावे लागते, यालाच हिंदू लोक 'कर्म' म्हणतात.

पाहा ईयोब 11:11-15 मध्ये ईयोबावर कोणते आरोप करतो

पाहा ईयोब 12:1-3 मध्ये सोफरच्या सल्ल्यावर ईयोबाने काय विचार केला.

गीतरत्न हे पुस्तक तरुण प्रेमिकांना वाटणारा जिव्हाळा व्यक्त केला आहे, त्यात मागून समूहगांनाचा प्रतिध्वनी ऐकायला येतो. यामध्ये देव व विश्वासणारे आणि आमचा प्रभू येशू ख्रिस्त व त्याची वधू, त्याचे शिष्य यांच्यामध्ये एकमेकांबद्दल असणाऱ्या प्रीती बद्दल सांगितले आहे.

प्राचीन इस्राएल लोकांनी गायलेली गीते, स्तोत्र

- बहुतेक सर्व ख्रिस्ती मंडळ्या उपासनेमध्ये स्तोत्रांचा उपयोग करतात.
- दावीद राजा, त्याचा उपासना पुढारी, असाफ आणि इतर रचनाकारांनी आपल्या खोल अंतरंगातील स्तुती, मध्यस्थी, राग, कृतज्ञता, तक्रारी आशा, निराशा आणि धन्यवाद ह्या भावना देवाकडे व्यक्त केल्या.
- पाहा 2 शमुवेल 23:1 ह्या वचनात दावीदाने त्याच्या जीवनाच्या अखेरीस काय म्हटले आहे.

सूज्ञतेची वचने: **नीतिसूत्रे**

नीतिसूत्रे ही सूज्ञपणाची वचने दावीदाचा मुलगा शलमोन राजा आणि इतर सूज्ञ माणसांनी लिहिली.

पाहा नीतिसूत्रे **अध्याय** 5 मध्ये

- व्यभिचारी स्त्रीचे बोलणे कशासारखे असते (वचने 3-4)
- तिची पाविले कोठे नेतात (वचने 5-6)
- पतींनी आपआपल्या पत्नींशी प्रामाणिक विश्वासू का राहिले पाहिजे (वचने 15-23)

नीतिसूत्रांतील अनेक वचने तरुणांना मार्गदर्शन करतात.

''माझ्या मुला, माझ्या वचनांकडे लक्ष लाव,
 माझ्या सांगण्याकडे कान दे
ती तुझ्या डोळ्यापुढून जाऊ देऊ नको,
 ती आपल्या अंत:करणांत ठेव
कारण ती ज्यांस लाभतात, त्यांस ती जीवन देतात
 आणि त्यांच्या सबंध देहाला आरोग्य देतात.
सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे
 विशेष रक्षण कर कारण त्यांत जीवनाचा उगम आहे'' (नीतिसूत्रे 4:20-23).



आळशी म्हणतो, ''रस्त्यावर सिंह आहे, चवाठ्यावर सिंह आहे, दरवाजा आपल्या बिजागऱ्यांवर फिरतो, तसा आळशी आपल्या अंथरूणावर लोळतो'' (नीतिसूत्रे 26:13-14).



पाहा नीतिसूत्रे 31:10-31 मध्ये सद्गुणी स्त्री करीत असलेली अनेक कामे वयोवृद्ध माणसाच्या निराशावादी तक्रारी: उपदेशक

एका वयस्कर लेखकाने बहुधा शलमोन, पृथ्वीवरील जीवनाच्या व्यर्थपणाची आठवण करून दिली आहे ('सूर्याखालील सर्व') त्याने प्रत्येक सुखाचा उपभोग घेण्याचा प्रयत्न केला. पण, शेवटी सर्व काही वायफळ ('वाऱ्याच्या मागे धावणे') असे दिसले.



**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून तुम्ही व ते पुढील आठवड्यात करणार असलेल्या कार्यक्रमांची आखणी करा.**

आई वडिलांची भेट घेऊन त्यांना नीतिसूत्रे 13:24, 19:18, 22:6, 23:13 ही वचने प्रत्यक्ष लागू करण्यास मदत करा.

त्यांच्या मुलांना नीतिसूत्रे 1:8-9 ही वचने आचरणात आणण्यास मदत करा.

पवित्र शास्त्राचा व्यापक अभ्यास करणाऱ्या विश्वासणाऱ्यांना ईयोब स्तोत्रसंहिता किंवा नीतिसूत्रे ह्या पुस्तकांचे काळजीपूर्वक परिक्षण करण्यास सांगा.

नवशिक्या मेंढपाळांना, ज्यांना तुम्ही प्रशिक्षण देत आहात, जुन्या कराराच्या पुस्तकातील काव्य समजून घेण्यास मदत करा.

स्तोत्रातून देव आणि त्याची स्तुती यावर लक्ष केंद्रित करणारी वचने निवडा. ह्या वचनांचा उपासनेत उपयोग करा.

**3. सहकाऱ्यांशी पुढील उपासनासभेविषयी चर्चा करा.**

जुन्या करारातील काव्याची आगळी वेगळी पद्धत आणि सौंदर्य स्पष्ट करून काही उदाहरणे वाचा.

विविध काव्यमय पुस्तकातील मुख्य विषय करून सांगा.

नीतिसूत्रांच्या पुस्तकातून काही नीतिवचने स्पष्ट करून सांगा.

काव्यमय पुस्तके वाचून आशीर्वाद मिळालेल्या विश्वासणाऱ्यांना त्यासंबंधी सांगू द्या.

मुलांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यास त्यांना संधी द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी स्तोत्र 133 वाचा आणि स्पष्ट करून सांगा की आम्ही येशूच्या यज्ञार्पणात्मक मरणाची आठवण म्हणून भाकरी मोडतो, तेव्हा विश्वासणाऱ्यांमध्ये असलेल्या गाढ ऐक्याचा आम्हाला अनुभव येतो

दोन किंवा तीन जणांचे गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करा आणि हिब्रू काव्यातील उपयुक्त वचनांची उजळणी करा.

**पाठ करा** स्तोत्र 145:1-2

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net